सकाळ

# ‘देवचंद’च्या विद्यार्थ्यांची क्वीक फाउंडेशनमध्ये निवड

नानीबाई चिखली, ता. ४ : अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालय आणि क्वीक हील फाउंडेशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. करारांतर्गत संगणकशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्वीक हील फाउंडेशन पुणेतर्फे क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. निवड झालेले विद्यार्थी ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

यामध्ये संगणकशास्त्र विभागातील अथर्व माने, श्रावणी पवार, आलोक कांबळे, रुद्र सुतार आणि समन्वयक म्हणून प्रा. प्रशांत कुंभार यांची या उपक्रमासाठी निवड केली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण ओरिएंटेशन विमाननगर (पुणे) येथील कंपनीच्या कार्यालयात पार पडले. त्यांना अजय शिर्के, गायत्री केसकर-पवार आणि दीपू सिंग यांनी मार्गदर्शन केले.

निवड झालेला विद्यार्थी महाविद्यालयाच्या परिसरातील शाळा, महाविद्यालये तसेच समाजातील विविध घटकांना सायबर सुरक्षेबाबत धडे देणार आहेत.



अर्जुननगर : येथील देवचंद कॉलेजमधून क्वीक फाउंडेशनमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत प्रा. प्रशांत कुंभार.